पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक २४ वा | शनिवार, दि. ०८ ऑगस्ट २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# करदात्यांच्या पैशाची उधळपट्टी! नवाकोरा होटगी रोड फोडण्यासाठी पुन्हा कोट्यवधींचा खर्च

## पहिले रस्ता बांधला... आता फोडा ! तीन पत्रांकडे दुर्लक्ष; १८ चेंबर्स बुजले, १२ क्रॉसिंग गायब

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या होटगी रोडवरील महिला हॉस्पिटल ते साखर कारखाना या सुमारे पाच किलोमीटरच्या नव्याने करण्यात आलेल्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याबाबत मोठा प्रशासकीय हलगर्जीपणाचा प्रकार समोर आला आहे. रस्त्याचे काम पूर्ण होऊन अवघे पंधरा दिवस उलटत नाहीत तोच हा कोट्यवधी रुपयांचा नवाकोरा रस्ता पुन्हा फोडण्याची वेळ आली आहे. कारण, महापालिकेने वारंवार लेखी सूचना देऊनही भूमिगत जलवाहिन्या, पाणीपुरवठा क्रॉसिंग आणि ड्रेनेज चेंबर्सची कामे पूर्ण न करता 'एमएसआयडीसी'ने थेट कॉंक्रिटीकरण केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. आता ही सर्व कामे करण्यासाठी तब्बल सुमारे ९ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च होणार असून, त्याचा फटका अखेर नागरिकांच्या पैशालाच बसणार आहे.

महिला हॉस्पिटल ते साखर कारखाना या मार्गाचे कॉंक्रिटीकरण सुरू होण्यापूर्वीच सोलापूर महापालिकेने 'एमएसआयडीसी'ला भूमिगत सुविधांची माहिती देत आवश्यक ती कामे आधी पूर्ण करण्याचे लेखी पत्र पाठविले होते. त्यानंतर २ जुलै आणि १७ जुलै रोजी स्वतंत्र स्मरणपत्रेही देण्यात आली. या पत्रांमध्ये जलवाहिनी क्रॉसिंग, ड्रेनेज चेंबर्स आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित सर्व कामे रस्ता तयार करण्यापूर्वी पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना करण्यात आल्या होत्या. मात्र, या तिन्ही पत्रांकडे दुर्लक्ष करत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण सुरूच ठेवण्यात आले.

यामुळे आता आसरा चौक परिसरात १८ इंची, २० इंची तसेच गोदूताई घरकुल योजनेची मुख्य जलवाहिनी नव्या कॉंक्रीट रस्त्याखाली दबली गेली आहे. एवढेच नव्हे तर ड्रेनेजची तब्बल १८ चेंबर्सही बुजल्याचे महापालिका आणि 'एमएसआयडीसी'च्या संयुक्त पाहणीत स्पष्ट झाले आहे. परिणामी भविष्यात पाणीपुरवठा, ड्रेनेज देखभाल आणि दुरुस्तीची कोणतीही कामे करणे अशक्य होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

महिला हॉस्पिटलकडून विमानतळाच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याच्या उजव्या बाजूस मोठ्या प्रमाणावर निवासी वसाहती आहेत, तर मुख्य जलवाहिनी डाव्या बाजूने जाते. त्यामुळे या भागातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा करण्यासाठी जलवाहिनी क्रॉसिंग करणे अत्यावश्यक होते. मात्र, त्या दृष्टीने कोणतीही जागा राखून न ठेवता सरळ कॉंक्रिटीकरण करण्यात आल्याने आता नव्याने तयार झालेला रस्ता खोदण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.



"महापालिका आणि एमएसआयडीसीची संयुक्त पाहणी झाली आहे. सर्व ठिकाणांची माहिती संबंधित विभागाला देण्यात आली आहे. साधारण १२ ठिकाणी जलवाहिनी क्रॉसिंग करावे लागणार आहे. मात्र, आसरा चौकातील तीन मुख्य जलवाहिन्या रस्त्याखाली बुजल्या आहेत. पूर्वकल्पना देऊनही आवश्यक कामे करण्यात आली नाहीत. आता रस्ता फोडूनच ही कामे करावी लागणार आहेत."
**- व्यंकटेश चौबे,** सार्वजनिक आरोग्य अभियंता, सोलापूर महापालिका

संयुक्त पाहणीत वृंदावन पार्क, आसरा चौक, भारतमाता, हत्तुरेवस्ती, शंकरनगरसह १२ ठिकाणी जलवाहिनी क्रॉसिंगची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले. या सर्व ठिकाणी क्रॉसिंगसाठी आवश्यक जागाच उपलब्ध करून देण्यात आली नसल्याने आता नवाकोरा कॉंक्रीट रस्ता फोडून ही कामे करावी लागणार आहेत.

महापालिका आणि 'एमएसआयडीसी'च्या संयुक्त बैठकीत बुजलेली १८ ड्रेनेज चेंबर्स खुली करणे, १२ ठिकाणी नवीन जलवाहिनी क्रॉसिंग करणे तसेच आसरा चौकातील तीन मुख्य जलवाहिन्यांचे क्रॉसिंग तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित ठिकाणांची संयुक्त पाहणीही करण्यात आली असून, लवकरच रस्ता फोडून प्रत्यक्ष काम सुरू होण्याची शक्यता आहे.

या प्रकारामुळे प्रशासकीय विभागांमधील समन्वयाचा अभाव पुन्हा एकदा उघड झाला आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून तयार करण्यात आलेला रस्ता काही दिवसांतच खोदावा लागणार असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. नियोजनाचा अभाव, पत्रव्यवहाराकडे दुर्लक्ष आणि जबाबदार यंत्रणांची हलगर्जी यामुळे सार्वजनिक निधीचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असल्याची टीका होत आहे.

**आता करावी लागणारी प्रमुख कामे**

- आसरा चौकात १८ इंची मुख्य जलवाहिनीचे क्रॉसिंग
- २० इंची मुख्य जलवाहिनीचे क्रॉसिंग
- गोदूताई घरकुल योजनेच्या मुख्य जलवाहिनीचे क्रॉसिंग
- रस्त्याखाली बुजलेली १८ ड्रेनेज चेंबर्स खुली करणे
- वृंदावन पार्क, आसरा, भारतमाता, हत्तुरेवस्ती, शंकरनगरसह १२ ठिकाणी नवीन जलवाहिनी क्रॉसिंग

# 'इफ्तियाज' नावाच्या व्यक्तींना ५ लिटर मोफत पेट्रोल

## १०१ लाडक्या बहिणींचाही विशेष सन्मान

### इफ्तियाज जलील यांच्या वाढदिवसानिमित्त अनोखा उपक्रम

### एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शौकत पठाण यांची घोषणा



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी खासदार इफ्तियाज जलील यांच्या वाढदिवसानिमित्त यंदाही सोलापूरमध्ये आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहे. सोमवार, १० ऑगस्ट रोजी सात रस्ता येथील कारीगर पेट्रोल पंपावर 'इफ्तियाज' नावाच्या व्यक्तींना ५ लिटर मोफत पेट्रोल देण्यात येणार असून, आगामी रक्षाबंधनाच्या निमित्ताने १०१ लाडक्या बहिणींनाही प्रत्येकी ५०० रुपयांचे मोफत पेट्रोल देऊन त्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. ही माहिती एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शौकत पठाण यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

शौकत पठाण म्हणाले की, इफ्तियाज जलील यांचा वाढदिवस १० ऑगस्ट रोजी असून, याच महिन्यात २८ ऑगस्टला रक्षाबंधन असल्याने महिलांचा सन्मान आणि सामाजिक संदेश देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढदिवस केवळ औपचारिक न साजरा करता समाजोपयोगी कार्यातून लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला सोलापूर शहरातील विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, एमआयएमचे नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

'इफ्तियाज' नावाच्या व्यक्तींनी मोफत पेट्रोलचा लाभ घेण्यासाठी वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) किंवा आधार कार्ड सादर करणे बंधनकारक राहणार आहे. विशेष म्हणजे, ज्यांच्याकडे वाहन नसले तरी त्यांचे नाव 'इफ्तियाज जलील' असेल, अशा व्यक्तींनाही ५ लिटर मोफत पेट्रोलचा लाभ देण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत होणार आहे.

**सलग दुसऱ्या वर्षी उपक्रम**

हा उपक्रम सलग दुसऱ्या वर्षी आयोजित करण्यात येत असून, गेल्या वर्षी 'इफ्तियाज' नावाच्या ३८५ व्यक्तींनी, तर ५० महिलांनी या उपक्रमाचा लाभ घेतल्याची माहिती शौकत पठाण यांनी दिली. यंदा लाभार्थ्यांची संख्या आणखी वाढेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**वाढत्या पेट्रोल दरात महिलांना दिलासा :** पत्रकार परिषदेत बोलताना शौकत पठाण यांनी वाढत्या महागाईवरही भाष्य केले. पेट्रोलच्या सातत्याने वाढणाऱ्या किमतीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित बिघडले असून, दररोज वाहनाचा वापर करणाऱ्या महिलांवर त्याचा मोठा परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत इफ्तियाज जलील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लाडक्या बहिणींना इंधन दरवाढीपासून काहीसा दिलासा मिळावा, या उद्देशाने १०१ महिलांना मोफत पेट्रोल देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शौकत पठाण यांनी नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करत, हा कार्यक्रम सामाजिक सलोखा, महिला सन्मान आणि लोकाभिमुख उपक्रमांचे प्रतीक असल्याचे नमूद केले. या पत्रकार परिषदेला तौफिक हत्तूरे, सोहेल पठाण, वहिदा शेख, रियाज शेख आदी उपस्थित होते.

# मोहोळच्या आष्टी उपसा सिंचन योजनेच्या तिसऱ्या टप्प्याला वेग; ११७ कोटींच्या कामांची टेंडर प्रक्रिया सुरू

## राजन पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; उत्तर भागातील शेतीला मिळणार मोठा दिलासा



मोहोळ (कटूसत्य वृत्त) :- मोहोळ तालुक्याच्या उत्तर भागातील शेतीला कायमस्वरूपी सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या महत्त्वाकांक्षी आष्टी उपसा सिंचन योजना (टप्पा क्र. ३) अंतर्गत विविध विकासकामांसाठी ११७ कोटी रुपयांच्या टेंडर प्रक्रियेला अधिकृतपणे प्रारंभ झाला आहे. या प्रक्रियेमुळे अनेक वर्षांपासून रखडलेल्या या महत्त्वाच्या सिंचन प्रकल्पाच्या कामांना गती मिळणार असून, तालुक्यात हरितक्रांतीचे नवे पर्व सुरू होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

या योजनेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष तथा माजी आमदार राजन पाटील यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यांच्या या अथक प्रयत्नांना अखेर यश आले असून, टेंडर प्रक्रिया सुरू झाल्याने प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला लवकरच सुरुवात होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मोहोळ तालुक्याच्या उत्तर भागातील अनेक गावे आजही सिंचनाच्या सुविधेपासून वंचित आहेत. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीमुळे शेतकऱ्यांना वारंवार आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत आष्टी उपसा सिंचन योजनेचा तिसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात शेतीखालील क्षेत्राला पाणी उपलब्ध होणार असून, कृषी उत्पादनात वाढ होण्यासह शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे.

माजी आमदार राजन पाटील यांनी स्वतःच्या राजकीय भवितव्यापेक्षा मोहोळ तालुक्यातील उपेक्षित भागातील जलसिंचनाचा प्रश्न प्राधान्याने हाताळला. शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या प्रयत्नांमध्ये माजी आमदार यशवंत माने यांनीही मोठ्या प्रमाणात पाठपुरावा केला असल्याचे सांगण्यात आले.

११७ कोटी रुपयांच्या टेंडर प्रक्रियेला प्रारंभ झाल्याने आता संबंधित कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामांना वेग मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्यानंतर मोहोळ तालुक्यातील उत्तर भागातील शेतीला बारमाही पाण्याचा आधार मिळणार असून, दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यास मोठी मदत होईल. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत केले जात आहे.

# उजनी धरण ९९.७८ टक्के भरले

## भीमा नदीत ४१,६०० क्युसेक्स विसर्ग कायम

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरणातील पाणीसाठा पुन्हा एकदा कमाल पातळीच्या जवळ पोहोचला असून, शुक्रवार (दि. ७ ऑगस्ट २०२६) सायंकाळी ६ वाजता जाहीर करण्यात आलेल्या अहवालानुसार धरणातील उपयुक्त पाणीसाठा ९९.७८ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणाची पाणीपातळी ४९६.८२० मीटर इतकी नोंदविण्यात आली असून, धरणात ३३१६.६६ दशलक्ष घनमीटर (११७.११ टीएमसी) इतका एकूण पाणीसाठा आहे. त्यापैकी १५१३.८५ दशलक्ष घनमीटर (५३.४६ टीएमसी) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे.

सध्या उजनी धरणाच्या सांडव्यातून ४० हजार क्युसेक्स, तर वीजगृहातून १,६०० क्युसेक्स असा एकूण ४१,६०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग भीमा नदीपात्रात सुरू आहे. त्यामुळे भीमा नदीची पाणीपातळी कायम उंचावलेली असून नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कतेचा इशारा कायम ठेवण्यात आला आहे.


धरणात दौंड नदी मापन केंद्रातून २५,७२६ क्युसेक्स पाण्याची आवक सुरू आहे. आवक आणि विसर्ग यामध्ये संतुलन राखत जलसंपदा विभाग परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे. पावसाचा जोर आणि पाणलोट क्षेत्रातील परिस्थितीनुसार विसर्गामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.



याशिवाय धरणातून मुख्य कालव्यात २,५५० क्युसेक्स, टनलद्वारे ९०० क्युसेक्स, सीना-माढा उपसा सिंचन योजनेत २१० क्युसेक्स आणि दहीगाव उपसा सिंचन योजनेत ९० क्युसेक्स पाणी सोडण्यात येत आहे. रिव्हर स्लुईसमधून सध्या कोणताही विसर्ग करण्यात आलेला नाही.

उजनी धरण जवळपास पूर्ण क्षमतेने भरलेले असल्यामुळे भीमा नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी विशेष दक्षता घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. नदीपात्रात किंवा पुलांवर जाणे टाळावे, जनावरे व शेतीची अवजारे सुरक्षित ठिकाणी हलवावीत तसेच लहान मुलांना नदीकाठी जाऊ देऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, जलसंपदा विभाग, भीमा खोरे पूर नियंत्रण कक्ष आणि स्थानिक प्रशासन परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असून, पावसाची तीव्रता आणि धरणातील आवक लक्षात घेऊन पुढील विसर्गाबाबत निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे भीमा नदीकाठच्या सर्व गावांतील नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.






## संपादकीय

# अधिवेशन पाण्यात!

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर एकीकडे विरोधी पक्षांच्या अंगात बळ संचारलं आहे, तर दुसरीकडे केंद्र सरकार बॅकफूटवर येताना दिसत आहे. यामुळे पावसाळी अधिवेशनाचा तिसरा आठवडासुद्धा असाच वाया जाण्याची शक्यता आहे. राजकारणात नेहमीच आपल्या योजनेनुसार होत नसतं याची प्रचिती केंद्र सरकारला सध्या आली असावी. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर सगळं काही सुरळीत होईल, कॉक्रोच जनता पाटीर्चं आंदोलन संपेल, विरोधकांच्या हल्ल्याची धार बोथट होईल आणि सभागृहात आपल्याला सर्व विधेयकं पारित करून घेता येईल, असं सरकारला सुरुवातीला वाटलं असेल. मात्र, होतंय अगदी उलट. प्रधान यांचा शिक्षण मंत्रिपदाचा राजीनामा घेतल्यानंतर सीजेपीचे कार्यकर्ते तर शांत झालेत, पण इंडिया आघाडीला कमालीचं बळ देऊन गेलेत.

जंतरमंतरवर आंदोलन करीत असलेल्या विद्यार्थ्यांवर पॅलेट गनचा वापर करण्याचा आदेश कुणी दिला? हा मुद्दा ते अशाप्रकारे रेटून लावत आहेत ज्यामुळे सरकारला थोडं मागं यावं लागलं आहे. पावसाळी अधिवेशनाचा पहिला आठवडा प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीत वाया गेला. दुसरा आठवडा पॅलेट गनचा वापर करण्याचा आदेश कुणी दिला? यात वाया गेला आहे. आता तिसरा आठवडासुद्धा यातच वाया जाण्याची शक्यता आहे. सरकारने गोंधळाच्या वातावरणातच नीट सुधारणा विधेयकासह दोन विधेयकं पारित करून घेतलेत. मात्र, आणखी बरेच विधेयक शिल्लक आहेत. पावसाळी अधिवेशनात जवळपास आठ विधेयकं मांडले जाण्याची तयारी सरकारने केली आहे. यात आयकर कायदा, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या, जन्म आणि मृत्यू नोंदणी, राष्ट्रीय सन्मान आणि एमएसएमई संबंधित दुरुस्त्यांचा समावेश आहे.

याशिवाय, एफसीआरए दुरुस्ती विधेयक आणि विकसित भारत शिक्षण प्रतिष्ठान विधेयक देखील पुढे नेणार आहे. दरम्यान, बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर, राम मंदिरावरून निर्माण झालेला वाद, महागाई, इथेनॉल मिश्रण, भ्रष्टाचार, परराष्ट्र धोरण आणि सामाजिक न्याय यांसारख्या मुद्द्यांवरून विरोधी पक्षाने सरकारची चौफेर कोंडी केली आहे.

याशिवाय, बजेट अधिवेशनात राहिलेले अर्थात प्रलंबित विधेयकसुद्धा पारित करून घ्यायचे आहेत. यात 25 मार्च 2026 रोजी लोकसभेत सादर करण्यात आलेल्या परकीय योगदान (नियमन) सुधारणा विधेयक, 2026, चा समावेश आहे. दुसरे विधेयक म्हणजे विकसित भारत शिक्षण पाया विधेयक, 2025. हे विधेयक 15 डिसेंबर 2025 रोजी लोकसभेत सादर केल्यानंतर संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले होते.

या विधेयकांच्या माध्यमातून, करप्रणाली, न्यायपालिका, नागरिक नोंदणी प्रणाली, राष्ट्रीय सन्मानांशी संबंधित कायदे आणि एमएसएमई क्षेत्रात आवश्यक कायदेशीर बदल घडवून आणण्याचा सरकारचा उद्देश आहे. पावसाळी अधिवेशनादरम्यान या विधेयकांवर सर्वसमावेशक चर्चा करून ती मंजूर करण्याचा सरकारचा प्रयत्न राहील.

याशिवाय, केंद्र सरकारच्या यादीत आणखी एक महत्त्वपूर्ण विधेयक आहे. ते म्हणजे, मतदारसंघाची पुनर्रचना विधेयक. यासाठी घटनेत संशोधन करावे लागणार आहे आणि सरकारला सभागृहात दोन तृतियांश मतांची गरज पडणार आहे. हे विधेयक सर्वात महत्त्वाचे मानले जात आहे. मात्र, सभागृहातील सध्याचे चित्र लक्षात घेता सरकार घटना संशोधन विधेयक सभापटलावर मांडू शकणार काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

केंद्र सरकारला दोन तृतियांश मतांची जुळवाजुळव करणे अजूनही अवघड वाटत आहे. इंडिया आघाडीतील दोन घटक पक्षांच्या खासदारांनी बंडखोरी करीत रालोआच्या छत्रछायेत सामील झाले असले तरी दोन तृतियांशचा आकडा गाठणे सरकारसाठी अवघड आहे. पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या पक्षातील 28 पैकी 20 खासदार फुटून नॅशनल कॉमन पीपल्स इनिशिएटिव्ह या पक्षात सामील झाले असून त्यांनी एनडीएला पाठिंबा दिला आहे.

सभापती ओम बिर्ला यांनी त्यांच्या विलीनीकरणाला मंजुरी दिली आहे. उद्धव ठाकरे यांच्या गटातील सहा खासदार एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले आहेत. सभापतींनी यालाही मंजुरी दिली आहे. तामिळनाडूमध्ये टीव्हीकेसोबत काँग्रेसच्या युतीनंतर, डीएमकेने इंडिया आघाडीतून माघार घेतली आहे. डीएमकेचे 22 खासदार आता विरोधी पक्षात गणले जाणार नाहीत. असे असले तरी ते रालोआला पाठिंबा देतील काय हा खरा प्रश्न आहे. डीएमके एनडीएमध्ये सामील झाली नसली तरी भाजपला आशा आहे की ते विधेयकांना मुद्द्यांवर आधारित पाठिंबा देतील. यासाठी भाजपचे रणनीतिकार योजनेची अंमलबजावणी करीत आहेत.

महत्त्वाची आणखी एक गोष्ट अशी की, राजीनामा दिल्यानंतर धर्मेंद्र प्रधान जेव्हा संसदेत आले तेव्हा भाजपच्या खासदारांनी मोठ्या जल्लोषात स्वागत केले. ही बाब भाजपच्या रणनीतिकारांना अजिबात आवडली नाही असं म्हणतात. प्रधान यांचे अशाप्रकारे स्वागत केल्यामुळे 'जेन झी'मध्ये चुकीचा संदेश जाण्याची भीती असल्याचं त्यांचं मत आहे.

भाजपचे खासदारांनी घोषणा देऊन त्यांचे पारंपरिक टोपी आणि शाल घालून स्वागत केले आणि हसतमुख प्रधान यांनी हात जोडून सर्वांचे अभिवादन स्वीकारले. 'हा राजीनाम्याचा सन्मान आहे की जबाबदारीची थट्टा?' असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला. देशातील सर्वात मोठ्या परीक्षेशी संबंधित कथित घोटाळ्यानंतर पायउतार व्हावे लागलेल्या नेत्याचा गौरव का? असे काँग्रेसने म्हटले आहे. काँग्रेस खासदार रेणुका चौधरी यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या स्वागत समारंभावर जोरदार हल्ला चढवला. बिल्किस बानो प्रकरणाचा दाखला देत म्हणाल्या की, हा त्याच राजकीय संस्कृतीचा एक भाग आहे ज्यामध्ये वादात अडकलेल्या लोकांनाही सार्वजनिक आदर दिला जातो.

शिक्षण मंत्रालयाचा कार्यकाळ हा प्रधान यांच्या राजकीय कारकिर्दीचा सर्वात कठीण अध्याय ठरला. नवीन शैक्षणिक धोरण, मातृभाषेवर आधारित शिक्षण आणि पीएम-श्री शाळा यासारख्या योजना पुढे नेत असतानाही त्यांचा कार्यकाळ सतत वादाच्या भोवऱ्यात राहिला.

राष्ट्रीय परीक्षांमधील पेपरफुटीचे आरोप, एनटीएच्या कार्यपद्धतीवरील प्रश्न, भरती परीक्षांमधील अनियमिततेचे आरोप, त्रिभाषेच्या सूत्रावरून तमिळनाडूशी संघर्ष, हिंदी लादल्याचा आरोप आणि शैक्षणिक संस्थांचे कथित भगवेकरण अशा अनेक कारणांनी त्यांना सतावत राहिले. शेवटी नीट वाद हा टर्निंग पॉईंट बनला ज्यामुळे त्यांना पदावरून पायउतार व्हावे लागले.

तसं पाहिलं तर धर्मेंद्र प्रधान यांना संसदेत मिळालेल्या सन्मानानेही भाजपला राजकीयदृष्ट्या कमकुवत होऊ द्यायचं नाही, हेच सूचित करायचं होतं. पक्ष संघटनेत राष्ट्रीय उपाध्यक्ष किंवा सरचिटणीसपदाची जबाबदारी देण्याबरोबरच त्यांना उत्तर प्रदेशचे निवडणूक प्रभारीही बनवले जाऊ शकते, असे मानले जात आहे. मात्र, प्रधान यांची इच्छा ओडिशात परत जाण्याची आहे. अर्थात, राज्याचा मुख्यमंत्री होण्याची इच्छा!

# सावधान ! राज्यासह देशात अतीवृष्टीचे रौद्ररूप पहाता; संभाव्य दुर्घटनांपासुन स्वतःला सांभाळा

सध्याच्या परिस्थितीत देशातील बहुतांश राज्यांमध्ये अतीवृष्टीमुळे अनेक ग्रामीण भाग, शहरी भाग व अती दुर्गम भाग जलमग्न झाल्याचे दिसून येते सोबतच मानवीय, वित्तीय व पशुंची हाणी मोठ्या प्रमाणात होत आहे. याकरीता प्रत्येकांनी सावधगिरीचे उपाय म्हणून नदी-नाले, तलाव, डोह, रोडचे खड्डे व रोडची वळणे यापासून सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. देशात सध्याच्या परिस्थितीत एक-दोन दिवस एकसारखा पाऊस आला की, संपूर्ण परिसर जलमग्न होतो आणि त्याचे दुष्परिणाम मानव, पशुपक्षी व वित्तीय हाणीच्या रूपात सर्वांनाच भोगावे लागते.याचे मुख्य कारण म्हणजे देशातील मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड होय. आज जंगलतोडीमुळे हवामानात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते याचा परिणाम निसर्गावर तर होतच आहे.परंतु मानवाच्या आरोग्यावर सुध्दा मोठा आघात करीत आहे.त्यामुळे देशात वाढती ढगफुटी, सुनामी, भुकंप, अती पाऊस, अती उष्णता इत्यादी अनेक नैसर्गिक आपदांचा सामना संपूर्ण जीवसृष्टीला करावा लागतो आहे. कारण वाढते सिमेंट रोड, शहरीकरण, औद्योगिकरण इत्यादींमुळे अनेक कारणांमुळे गावखेडे नष्ट होत आहेत.आज प्रत्येक शहराच्या केंद्रस्थानापासुन २० किलोमीटरपर्यंत शहराचे जाळे पसरल्याचे दिसून येते.यामुळे पाऊसाचे पाणी जमिनीत न जाता सरळ नदी-नाल्यांना,तलाव,धरण यांना जाऊन मिळते व अशा परिस्थितीत सर्वत्र पुरपरिस्थिती निर्माण झालेली दिसून.त्याचप्रमाणे शहरी भागात सिमेंट रोड झाले खरे पण ड्रेनेज सिस्टीमचा अभाव असल्याने राज्यासह देशातील अनेक शहर जलमग्न होतांना दिसतात व शहरात पुरपरिस्थिती निर्माण होते. असे अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत आणि त्याचे परिणाम भोगत सुध्दा आहोत. कारण देशातील अनेक राज्यात पावसाचे थैमान;पूर-भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे. आताही महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली जात आहे यामुळे ७ जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. नुकत्याच झालेल्या विदर्भातील तुफान पावसामुळे सहा जणांचा मृत्यू झाला. यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा-लोणी मार्गावरील कुपटी नदीच्या पुलावरून कार वाहून गेल्याने आईसह दोन मुलींचा मृत्यू झाला.भंडारा आणि वर्ध्यात प्रत्येकी एक वाहून गेल्याने दगावले, बुलढाण्यात भिंत कोसळून महिला दगावली, भिवंडी शहरातील भोईवाडा गंगारामवाडी परिसरातील "कोहिनूर"ही धोकादायक इमारत कागदी पत्याच्या बंगल्यासारखी गुरुवारी रात्री कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत १० लोकांचा मृत्यू झाला.अशाप्रकारे राज्यात अती पावसामुळे आतापर्यंत ७६ जणांचा मृत्यू झाला तर ८१ जण गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जाते.म्हणजे आपण ज्याप्रमाणे निसर्गावर अत्याचार करीत आहोत त्याच्या दुप्पट तो पावसाच्या रूपात रौद्र रूप धारण करून संपूर्ण सृष्टीवर घणाघाती प्रहार करीत आहे आणि याला दोषी आपणच म्हणजे संपूर्ण मानवजाती आहे.आज वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात केल्याचे सांगितले जाते.परंतु ८० टक्के वृक्षारोपण हे फक्त कागदावरच असल्याचे दिसून येते.कारण आपण हजारो एकर जमीनीवरील वृक्ष कटाई केली आणि त्याठिकाणी उद्योग धंदे, शहरीकरण, खाणी, औद्योगीकरण, रस्त्यांचे जाळे विणले मग वृक्षारोपण कुठे केले?जर वृक्षारोपण केले तर पाणी जमिनीत का मुरत नाही याचाही अभ्यास सरकारने करायला हवा.राजकीय पुढारी एक वृक्ष लावते आणि फोटो काढून मिडिया समोर फोटोसेशन करते ही कसली वृक्षलागवड म्हणायची!याला वृक्षलागवड म्हणता येणार नाही तर हा फक्त ड्रामा म्हणावा लागेल.आजही राज्यासह देशातील अनेक भागात बंजार जमीन किंवा पडीत जमीन आहे.त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायलाच पाहिजे आणि त्या वृक्षांची जोपासना सुध्दा व्हायला पाहिजे.तेव्हा अती पाऊसाचा ओघ थांबविता येईल असे मला वाटते.कारण राज्यासह देशात युध्दपातळीवर वृक्षलागवड झाली नाही तर येणाऱ्या काळात अती पाऊस,अती उष्णता, सुनामी, भुकंपा सारखे महाभयंकर प्रकार रौद्ररूप धारण करून मोठ्या प्रमाणात मानवी, वित्तीय व पशुपक्षांची हाणी पोहचवू शकते यालाही नाकारता येत नाही. अती पावसामुळे दऱ्याखोऱ्यात, ग्रामीण भागात,अती दुर्गम भागात विषेली साप निघतात अशीच घटना ठाण्यामध्ये ग्रामीण भागात घडली गावापासून मुख्य रस्त्याला लागण्यासाठी पक्का रस्ताच नसल्याने डोली करून दऱ्याखोऱ्यांतून पायवाटेने ५ कि.मी.वरील रूग्णालयात डोलीतून घेऊन जातांना चौथीत शिकणाऱ्या ९ वर्षीय मुलाचा झोपेत साप चावल्याने दुर्दैवी मृत्यू झाला अशा भयावह घटना अती पाऊसामुळे होत आहे.राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानंतर शनिवारी पावसाचा जोर काहीसा कमी झाला.मात्र गेल्या दोन-तीन दिवसांत घाटमाथा, कोकण, पुणे, सातारा, नाशिक,मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदभार्तील अनेक भागांत जोरदार पाऊसाने सर्वत्र तारांबळ उडाली. आता पाऊस जरी ओसरला असला तरी १५ तारखेनंतर पाऊसाचा जोर जास्त वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे त्यामुळे सर्वांनीच नदी-नाले,तलाव, धरणे,डोह, दऱ्याखोऱ्यापासुन सावध रहाने गरजेचे आहे.हवामान खात्याने असेही वर्तवले आहे की,पुढील चार दिवसाकरीता विदर्भासह महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाच्या बाबतीत रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आहे म्हणजे अती पाऊसाचा धोका अजुन पर्यंत टळलेला नाही. देशात अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे.यात उत्तराखंड, छत्तीसगड, केरळ, कर्नाटक, ओदिशा, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, बिहार व राजस्थानमध्ये पावसामुळे विविध दुर्घटना घडल्या आहेत.राज्यासह देशात अती पावसामुळे होणाऱ्या दुर्घटना लक्षात घेता संपूर्ण राज्य सरकारांनी सर्वप्रथम रोडच्या खड्ड्यांची दुरूस्ती ताबडतोब करावी व दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक रोडच्या वळणावर आवश्यक ते बोर्ड लावावे व डेंजर झोनच्या ठिकाणी सुरक्षा कर्मचारी तैनात केले पाहिजे.त्याचप्रमाणे वाढत्या पावसाचे प्रमाण पहाता नागरिकांनी व युवकांनी नदी-नाले, तलाव, डोह, धरण व विजांचा लखलखाट यापासून सावधगिरी बाळगली पाहिजे.त्याचप्रमाणे देशात वाढता सेल्फीचा क्रेझ पहाता सावधगिरी बाळगावी अन्यथा सेल्फीचा क्रेझ महागात पडू शकतो.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# कोरवली येथे अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त स्पर्धांचा उत्साह



**मोहोळ,(कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील कोरवली येथे अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव मंडळाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये विविध शैक्षणिक व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. वक्तृत्व स्पर्धेत अनन्या गायकवाड, आरुषी गायकवाड आणि समृद्धी दसाडे या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट भाषणाने उपस्थितांची मने जिंकली. सर्वच स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

स्पर्धेनंतर पार पडलेल्या पारितोषिक वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून आधुनिक लहुजी शक्ती सेनेच्या संस्थापक अध्यक्षा नगीनाताई सोमनाथ कांबळे (धाराशिव) आणि प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण क्षीरसागर उपस्थित होते.

यावेळी सोलापूर जिल्हा अध्यक्षा अर्चनाताई देडे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षा स्वातीताई आरडे, पश्चिम महाराष्ट्र सचिव राहुल आरडे, बार्शी तालुका अध्यक्षा शारदा खुडे यांच्यासह उत्सव मंडळाचे पदाधिकारी, शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्या आणि सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व शैक्षणिक साहित्य देऊन गौरवण्यात आले. उत्सव मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमाचे कोरवली ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महादेव गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, अविनाश गायकवाड, सागर गायकवाड, आर्यन गायकवाड, सोमनाथ गायकवाड, सुधीर गायकवाड, मधु गायकवाड, सहदेव ऐवळे, यश गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

# केम मंडळातील मंडळ अधिकाऱ्यांच्या बदलीची मागणी

## प्रहारचे संदीप तळेकर यांचे तहसीलदारांना निवेदन

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यातील केम मंडळातील कार्यरत मंडळ अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी होत असल्याचा आरोप करत संबंधित मंडळ अधिकाऱ्यांची तातडीने बदली करून नवीन मंडळ अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे करमाळा तालुकाध्यक्ष संदीप तळेकर यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, केम मंडळांतर्गत आठ गावे असून महसूल विभागाशी संबंधित विविध कामांसाठी नागरिकांना मंडळ कार्यालयाशी सातत्याने संपर्क साधावा लागतो. मात्र, संबंधित मंडळ अधिकारी कार्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याने अनेक वेळा नागरिकांना रिकाम्या हाताने परत जावे लागत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

यामुळे फेरफार नोंदी, वारस नोंदी, उत्पन्न व रहिवासी दाखले, जमिनीशी संबंधित कामे, पंचनामे तसेच इतर महसुली कामांमध्ये अनावश्यक विलंब होत असून नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच केवळ केम गावातीलच नव्हे, तर मंडळातील इतर गावांतील नागरिकांकडूनही संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.



प्रशासनाने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित मंडळ अधिकाऱ्यांच्या कार्यालयीन उपस्थितीची, प्रलंबित कामांची व नागरिकांच्या तक्रारींची वस्तुनिष्ठ पडताळणी करावी. तसेच आवश्यक वाटल्यास संबंधित अधिकाऱ्यांची नियमानुसार तातडीने बदली करून केम मंडळासाठी नवीन मंडळ अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी, करमाळा तसेच जिल्हाधिकारी, सोलापूर यांनाही माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. दरम्यान, ग्रामसभेचा सवार्नुमते ठराव आणि नागरिकांच्या सातत्याने होत असलेल्या तक्रारी लक्षात घेता प्रशासन या मागणीवर काय निर्णय घेते, याकडे केम मंडळातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे, या विषयावर केम ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेतही संबंधित मंडळ अधिकाऱ्यांच्या बदलीचा ठराव सवार्नुमते मंजूर करण्यात आला असून, त्यानंतरही परिस्थितीत सुधारणा न झाल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# शेतकरी कर्जमुक्तीच्या लाभासाठी पात्र लाभार्थ्यांनी आधार प्रामाणीकरण करावे - जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026 जाहीर केली या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात सोलापूर जिल्ह्यातील 1 हजार 78 गावातील 26 हजार 253 पात्र थकबाकीदार लाभार्थी शेतकऱ्यांची पहिली यादी गावातील विकास संस्था, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील 19 हजार 800 लाभार्थ्यांनी आपले सरकार सेवा केंद्र व संबंधीत बँक शाखेच्या माध्यमातून त्यांचे ई-केवायसी पूर्ण करून घेतलेले आहे. तरी अद्याप जिल्ह्यातील जवळपास 6 हजार 500 लाभार्थी आधार प्रमाणीकरणान्वये ई-केवायसी करणे बाकी असून सदर पात्र लाभार्थ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण करून घ्यावे असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी लाभ मिळवण्यासाठी ई-केवासी (आधार प्रमाणीकरण) करणे अनिवार्य आहे. सदर पात्र लाभार्थ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण करून घेणे अत्यावश्यक आहे. जेणेकरून त्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम शासनाकडून जमा झाले नंतर ते नव्याने पीक कर्ज घेण्यासाठी पात्र ठरणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज शुक्रवार दि. 7 ऑगस्ट रोजी व्ही.सी. व्दारे झालेल्या बैठकीत त्यांनी आजपर्यंत आधार प्रमाणीकरण केलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये कर्जमाफीचा लाभ डीबीडीद्वारे जमा केले असल्याचे सांगितले. कर्ज मुक्तीनंतर शेतकऱ्यास कर्ज बेबाकी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कर्ज मुक्त झाल्यानंतर सर्व कर्जमुक्त शेतकऱ्यांच्या याद्या संबंधीत बँकेच्या शाखेत व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थामध्ये लावण्यात येणार आहे. कर्ज मुक्तीचा



लाभ मिळालेल्या सर्व शेतकऱ्यांना संबंधीत बँकेमार्फत त्वरीत पीक कजार्ची उपलब्धता होणार आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मध्यमातून आज 2 हजार 529 लाभार्थ्यांना रक्कम रू.25.33 कोटी खात्यावर जमा झालेली आहे. इतर राष्ट्रीयकृत बँकामध्येही पात्र लाभार्थ्यांच्या कर्जखात्यावर रकमा जमा झालेले असून त्याबाबतचे संदेश शेतकऱ्यांना शासनाकडून देण्यात आलेले आहेत.

कर्जमाफी योजनेच्या पोर्टलवरील रक्कम किंवा पोर्टलवरील शेतकऱ्यांच्या कजार्बाबत इतर कोणताही तपशील शेतकऱ्यास अमान्य असल्यास लाभार्थ्यानें पोर्टलवर तक्रारीची (Grievance) नोंद करावी. सदर तक्रारीचे निराकरण जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत केले जाणार आहे.ज्या पात्र लाभार्थ्यांचे निधन झाले आहे अशा लाभार्थ्यांच्या वारसाने बँकेकडे मयत कर्जदाराच्या कर्ज खात्यास वारस नोंद करण्याची कार्यवाही करणे व अॅग्रीस्टॅक काढून बँकेस कळविल्यानंतर सदर कर्ज खात्याच्या कर्ज माफीबाबत बँकेमार्फत पुढील कार्यवाही होणार आहे.

आधार प्रमाणीकरण करताना कोणतीही अडचण असल्यास लाभार्थ्यांनी संबंधीत तालुक्यातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयामध्ये संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी केले आहे.

# आजाराने श्रीकांत गायकवाड यांचे निधन

## शनिवारी मोहोळ येथे अंत्यसंस्कार

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** येथील सोमराय नगर परिसरातील रहिवासी श्रीकांत तुळजाराम गायकवाड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांसह परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांची अंत्ययात्रा शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता सोमराय नगर, मोहोळ येथील राहत्या घरापासून निघणार आहे. त्यानंतर पुणे रोडवरील बीएसएनएल कार्यालयाशेजारील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली आहे. श्रीकांत गायकवाड यांनी राजकारणात व समाजकारणात चांगले योगदान दिले आहे. श्रीकांत गायकवाड यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, व पत्नी कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्रपरिवार असा मोठा परिवार असून त्यांच्या निधनाबद्दल विविध स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## CHANGE IN NAME

I am changing my name from **MUZAMMIL SAIPANSAB BAGWAN** To **MUZAMMIL SAIFANSAB BAGWAN** for passport issuance as per document.

# अॅड. जीवनदत्त आरगडे यांच्यावर किसान काँग्रेसच्या पूर्व उत्तर प्रदेश प्रभारीपदाची जबाबदारी

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय किसान काँग्रेसच्या संघटनात्मक विस्ताराला अधिक बळ देण्याच्या दृष्टीने बार्शी येथील अॅड. जीवनदत्त आरगडे यांची पूर्व उत्तर प्रदेश प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातील आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती संघटनात्मकदृष्ट्या महत्त्वाची मानली जात असून, शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून पूर्व उत्तर प्रदेशात किसान काँग्रेसची संघटनात्मक बांधणी अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्या शिफारशीनुसार, अखिल भारतीय किसान काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष सुखपालसिंग खैरा यांच्या सूचनेवरून संघटन प्रभारी तथा राष्ट्रीय उपाध्यक्ष अखिलेश शुक्ल यांनी अॅड. जीवनदत्त आरगडे यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे.

अखिल भारतीय किसान काँग्रेसकडून ६ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या अधिकृत नियुक्तीपत्रानुसार, अॅड. आरगडे हे पूर्व उत्तर प्रदेशातील संघटनात्मक कामकाजाची जबाबदारी सांभाळणार असून, उत्तर प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष तसेच पूर्व उत्तर प्रदेश प्रदेश किसान काँग्रेसच्या अध्यक्षांसोबत समन्वय साधून काम करणार आहेत. किसान काँग्रेसचे पुनरुज्जीवन करून संघटना अधिक सक्रिय, गतिमान आणि प्रभावी करण्याबरोबरच काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्याची अपेक्षाही नियुक्तीपत्रात व्यक्त करण्यात आली आहे.

पूर्व उत्तर प्रदेश हा सामाजिक, राजकीय आणि कृषी क्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रदेश मानला जातो. शेतीमालाला योग्य भाव, वाढता उत्पादन खर्च, सिंचनाच्या सुविधा, कृषी कर्ज, पीकविमा, नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे नुकसान, शेतमजुरांच्या रोजगाराचे प्रश्न, ग्रामीण



भागातील मूलभूत सुविधा तसेच लहान व सीमांत शेतकऱ्यांच्या विविध समस्यांना संघटनात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, या बाबींवर किसान काँग्रेसच्या माध्यमातून विशेष भर दिला जाणार आहे.

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील पक्षसंघटना अधिक सक्षम करण्यासाठी गाव, तालुका आणि जिल्हा पातळीवरील कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद, शेतकरी व शेतमजूर संघटनांशी समन्वय, स्थानिक प्रश्नांचा अभ्यास, जनसंवाद उपक्रम, शेतकरी बैठका आणि विविध संघटनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून पक्षाची भूमिका सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी स्थानिक पातळीवरील प्रश्न आणि प्रादेशिक परिस्थिती लक्षात घेऊन संघटनात्मक कार्यपद्धती विकसित करण्यावर भर राहणार आहे.

अॅड. जीवनदत्त आरगडे हे सध्या अखिल भारतीय किसान काँग्रेसचे राष्ट्रीय समन्वयक म्हणून कार्यरत असून, आता त्यांच्याकडे पूर्व उत्तर प्रदेश प्रभारीपदाची अतिरिक्त आणि महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संघटनात्मक समन्वय, जनसंपर्क आणि विविध सामाजिक प्रश्नांच्या अनुषंगाने कार्यकर्ते व नागरिकांशी संवाद साधण्याच्या अनुभवाचा उपयोग पूर्व उत्तर प्रदेशातील किसान काँग्रेसची संघटनात्मक व्याप्ती वाढविण्यासाठी केला जाणार असल्याचे मानले जात आहे.

विशेषतः शेतकरी आणि शेतमजूर हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असल्याने त्यांच्या प्रश्नांकडे केवळ निवडणुकीच्या दृष्टीने न पाहता, त्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आर्थिक, सामाजिक आणि प्रशासकीय अडचणी समजून घेऊन त्या प्रभावीपणे मांडण्यासाठी व्यापक जनसंपर्क अभियान राबविण्यावर भर राहणार आहे. स्थानिक कार्यकर्त्यांना संघटनात्मक प्रक्रियेत अधिक सक्रिय करून गावपातळीपासून प्रदेशपातळीपर्यंत समन्वयाची साखळी मजबूत करण्याचे आव्हानही या नियुक्तीमुळे आरगडे यांच्यासमोर असणार आहे.

अखिल भारतीय किसान काँग्रेसच्या अधिकृत नियुक्तीपत्रात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी वाड्रा यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाची विचारधारा अधिक व्यापक करण्यासोबत किसान काँग्रेस अधिक सशक्त आणि गतिमान करण्यासाठी आरगडे यांनी योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या नियुक्तीची प्रत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे उत्तर प्रदेश प्रभारी, पूर्व उत्तर प्रदेश प्रभारी सचिव, उत्तर प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तसेच उत्तर प्रदेश किसान काँग्रेस (पूर्व)चे अध्यक्ष राम आधार जोसेफ यांच्याकडेही अधिकृतरीत्या पाठविण्यात आली आहे.

उत्तर प्रदेशातील आगामी राजकीय घडामोडी आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर किसान काँग्रेसने पूर्व उत्तर प्रदेशासाठी स्वतंत्रपणे संघटनात्मक जबाबदारी निश्चित केल्याने या नियुक्तीकडे विशेष लक्ष वेधले जात आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि कृषी क्षेत्राशी निगडित घटकांचे प्रश्न संघटित पद्धतीने मांडणे, स्थानिक नेतृत्वाला बळ देणे आणि काँग्रेसची ग्रामीण भागातील संघटनात्मक पायाभरणी अधिक मजबूत करणे, या दृष्टीने अॅड. जीवनदत्त आरगडे यांची भूमिका आगामी काळात महत्त्वाची ठरणार आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादक: पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागार: अॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात भारतीय हरित क्रांतीचे जनक डॉ एम एस स्वामीनाथन यांना अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत भारतीय हरित क्रांतीचे जनक डॉ एम एस स्वामीनाथन यांची जयंती शाश्वत शेती दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ एम एस स्वामीनाथन यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. सायली बडेकर, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सुषमा ढावरे तसेच महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाचे विद्यार्थी अभिजीत तनपुरे, वैष्णवी मागाडे, मैथिली कोळी यांनी डॉ एम एस स्वामीनाथन यांचे कृषी क्षेत्रातील कार्य व भारताच्या अन्नसुरक्षेतील योगदान याविषयी मनोगत व्यक्त केले. प्रा सायली बडेकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की डॉ. एम. एस. स्वामीनाथन हे केवळ एक शास्त्रज्ञ नव्हते, तर ते भारताचे अन्नसुरक्षेचे शिल्पकार होते. त्यांनी आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर करून गहू आणि तांदळाच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती विकसित केल्या. त्यांनी केवळ प्रयोगशाळेत संशोधन केले नाही, तर ते संशोधन शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचवले. त्यांच्या या क्रांतीमुळे भारताचे कोठार अन्नधान्याने भरून गेले आणि भारत हा अन्न आयात करणाऱ्या देशांमधून जगाला अन्न निर्यात करणारा देश बनला.




म्हणूनच त्यांना 'भारताच्या हरित क्रांतीचे जनक' म्हटले जाते. आज हवामान बदल, पाण्याची टंचाई आणि वाढती लोकसंख्या यांमुळे आपल्या शेतीसमोर पुन्हा एकदा मोठी आव्हाने उभी राहिली आहेत. स्वामीनाथन यांनी नेहमी 'शाश्वत शेती' आणि 'सदाहरित क्रांती' यावर भर दिला. म्हणजेच, निसगार्चे नुकसान न करता शेतीचे उत्पादन वाढवणे. आपल्या देशातील तरुण पिढीने कृषी क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती आणि कृषी-व्यवसाय यांकडे वळले पाहिजे. शेतकऱ्याला त्याच्या घामाचे योग्य दाम मिळवून देणे आणि शेतीला मानाचे स्थान मिळवून देणे, हीच डॉ. स्वामीनाथन यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती जाधवर यांनी व आभारप्रदर्शन मैथिली कोळी यांनी व्यक्त केले.

# पिडीत मुलीला मिळाला न्याय; आरोपीस २० वर्ष सक्षम कारावास

## अकलूज पोलिसांच्या दमदार कामगिरीचे कौतुक

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** पिडिते सोबत राहून, तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीस,२० वर्ष सक्षम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली असून,दमदार कामगिरीमुळे अकलूज पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अकलूज पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ११/११/२०२३ रोजी फियार्दीची अज्ञान मुलगी (पिडिता) हिला, फियार्दीचा भाऊ याने महाळुंग ता. माळशिरस येथे नेले होते व त्याच्या दुस-या दिवशी कुलदैवत राजबकक्षल दर्गा अकलुज येथे देवदर्शन करुन, पिडितेला फिर्यादीच्या घरी तो आणुन सोडणार होता.

दिनांक २०/११/२०२३ रोजी आरोपी क. २. अमर रहिम शेख याने, पिडितेला फियार्दीच्या भावाकडुन, तिला फिर्यादीच्या घरी नेऊन सोडतो असे सांगुन, पिडितेला अकलुज मधून त्याच्याकडे घेतले. त्यानंतर त्याने आरोपी क. १. तसलिम ताजुद्दीन शेखची मदत घेऊन, पिडितेला पळवुन नेले. आरोपी क. १. तसलिम ताजुद्दीन शेख याने मोटार सायकलवरुन, अकलुजहुन आरोपी क. २. अमर रहिम शेख व पिडितेला माळशिरस बसस्थानकावर सोडले.

माळशिरस बसस्थानकावरुन आरोपीने पिडितेला सातारा, गणपतीपुळे, विशाळगड इ. ठिकाणी दिनांक २०/११/२०२३ ते दिनांक १२/१२/२०२३ या कालावधीत नेले व त्या ठिकाणी हॉटेल/लॉज/रुममध्ये पिडितेसोबत राहुन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. या गुन्हयाचा सहा. पोलीस निरीक्षक गणेश बी. चौधरी यांनी सखोल तपास करुन आरोपीविरुध्द जिल्हा व सत्र न्यायालय, माळशिरस या न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. सदरची न्याय चौकशी एल. डी. हुली, जिल्हा व सत्र न्यायाधीश, माळशिरस यांच्या समोर चालून या प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकुण १३ साक्षीदार तपासण्यात आले व आरोपी क. २ च्या बाजूने, २ साक्षीदार तपासण्यात आले. दोन्ही आरोपीच्या विरोधात गुन्हा सिद्ध झाल्याने, दोन्ही आरोपींना दोषी धरुन एल. डी. हुली, जिल्हा सत्र न्यायाधीश माळशिरस यांनी आरोपी क. १. तसलिम ताजुद्दीन शेख यास कलम ३६३ सह ३४ अंतर्गत ३ वर्षे सक्षम कारावास व ३,०००/- रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिन्याची साधा तुरुंगवास व आरोपी क. २. अमर रहिम शेख यास ३६३ सह ३४ अंतर्गत ३ वर्षे सक्षम कारावास व ३,०००/- रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिन्याची साधा तुरुंगवास व बालकांचे लैंगिक गुन्हयापासून संरक्षण अधिनियम कलम ४ अंतर्गत २० वर्षे सक्षम कारावास व ७,०००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिन्याची साधा तुरुंगवास अशी शिक्षा ठोठावण्यात आली.



सदर केस मध्ये पिडिता व तिची आई (फिर्यादी), फिर्यादीचा भाऊ, दोन वैदयकिय अधिकारी, लॉज/हॉटेलचे मालक व तपासी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक गणेश चौधरी यांचे साक्ष महत्वाच्या ठरल्या.

सदर केसमध्ये संतोष वाळके, उपविभागीय पोलीस अधिकारी अकलुज उपविभाग, अकलुज, निरज उबाळे पोलीस निरीक्षक, अकलुज पोलीस ठाणे यांनी मार्गदर्शन केले. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे ॲड. संग्राम एस. पाटील यांनी काम पाहिले. तसेच कोर्ट पैरवी पो. हे. कॉ. आर. एम. तांबोळी व पो.कॉ. के. एस. हांगे या दोघांनी पाहिले व त्यांना पोलिस निरिक्षक निरज उबाळे, अकलुज पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शन लाभले.


**जाहीर प्रसिध्दीकरण** कि.अर्ज नं.५१२/२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात-**

अर्जुन सुखदेव कांबळे वय - ४२ वर्षे, धंदा- मजुरी, रा. पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदाराचा मुलगा संस्कार अर्जुन कांबळे हा मौजे पाटकुल, ता. मोहोळ येथे अर्जदाराचे राहते घरी दि. ०७/०५/२०११ रोजी जन्मलेला आहे. त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत पाटकुल, ता.मोहोळ, जि. सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. अर्जदाराचा मुलगा संस्कार अर्जुन कांबळे याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत पाटकुल चे जन्माचे रजिस्टरला व्हावे याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे. त्याअर्थी अर्जदाराचा मुलगा संस्कार अर्जुन कांबळे याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत पाटकुल यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत अथवा दि. २३/८/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत म्हणणे न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जातील मागणी प्रमाणे पुढील जरुर ते आदेश होतील याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता. ७/८/२०२६

शिक्का **तहसिलदार मोहोळ.**

**जाहीर प्रसिध्दीकरण** कि.अर्ज नं.५१३/२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात-**

अर्जुन सुखदेव कांबळे वय ४२ वर्षे, धंदा- मजुरी, रा. पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत पाटकुल, ता. मोहोळ, जि.सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांची मुलगी समृध्दी अर्जुन कांबळे हिचा जन्म ता. ०८/११/२००८ रोजी मौजे पाटकुल, ता. मोहोळ येथे अर्जदाराचे राहते घरी झालेला आहे. तिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत पाटकुल, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. अर्जदार यांची मुलगी समृध्दी अर्जुन कांबळे हिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत पाटकुल चे जन्माचे रजिस्टरला व्हावे याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे. त्याअर्थी अर्जदार यांची मुलगी समृध्दी अर्जुन कांबळे हिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत पाटकुल यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत अथवा दि.२३/८/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत म्हणणे न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जातील मागणी प्रमाणे पुढील जरुर ते आदेश होतील याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता.७/८/२०२६

शिक्का **तहसिलदार मोहोळ.**

**जाहीर प्रसिध्दीकरण** कि. अर्ज नं./२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब,यांचे कोर्टात**

दिलीप धोंडिबा भानवसे वय ६० वर्षे,धंदा- मजुरी, रा. सौंदणे,ता.मोहोळ,जि. सोलापूर, } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामसेवक,ग्रामपंचायत सौंदणे,ता.मोहोळ,जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडिल धोंडिबा भिमराव भानवसे यांचा दि.२३/०७/२०१३ रोजी मौजे सौंदणे, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे राहत्या घरी मृत्यु झाला असलेने अर्जदार हा त्यांचा मुलगा असुन अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे मयत धोंडिबा भिमराव भानवसे यांच्या मृत्यु दाखल्याची ता.०५/०८/२०२६ रोजी मागणी केलेली होती, परंतु ग्रामसेवक, ग्रामपंचायत सौंदणे, ता. मोहोळ यांनी त्यांच्या अभिलेखात २०१३ सालचे संपुर्ण अभिलेख तपासले असता अर्जदार यांचे वडिल धोंडिबा भिमराव भानवसे यांच्या मृत्युची नोंद नमुद नसल्याचे दिसुन आलेले असुन त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात ग्रामसेवक, ग्रामपंचायत सौंदणे, ता. मोहोळ चे मृत्यु रजिस्टरला नोंद घेवुन अर्जदार यांना तसे मृत्यु प्रमाणपत्र देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करणेबाबत अर्ज केला आहे. याबाबत कोणाची हरकत, आक्षेप असल्यास दि.२९/४/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावेत. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे मृत्युचा दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता. ७/८/२०२६

शिक्का **तहसिलदार मोहोळ, ता. मोहोळ, जि.सोलापूर.**


# शासकीय वसतिगृह योजनेसाठी प्रवेशाचे वेळापत्रक जाहिर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवगार्तील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वषार्साठी व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला ७ ऑगस्ट २०२६ पासून प्रारंभ होत आहे. बारावीनंतर किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण होऊन उच्च शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, सोलापूर गणेश सोनटक्के यांनी केले आहे.

शासकीय वसतिगृह योजनेची प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून त्यासाठी प्रवेश प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. नवीन विद्यार्थ्यांनी ँ३३स्र२://ँ२ल्लीद्ब्३.ङ्ग१ॅ/ या संकेतस्थळावरील ठीद्ब पयार्यातून अर्ज सादर करावेत.

प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे : अर्ज स्वीकारण्याचा कालावधी ७ ते ३१ ऑगस्ट २०२६, अर्ज छाननी १ ते ७ सप्टेंबर २०२६, पहिली गुणवत्ता यादी ८ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. पहिल्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना १८ सप्टेंबर २०२६ पर्यंत प्रवेश घेता येईल. रिक्त जागांसाठी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांची दुसरी गुणवत्ता यादी २१ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत प्रवेश निश्चित करावा.

वसतिगृहातील प्रवेश रिक्त जागांच्या उपलब्धतेनुसार आरक्षणाच्या निकषांनुसार करण्यात येणार आहेत. त्यामध्ये इतर मागास प्रवर्ग (५१ टक्के), विमुक्त जाती-भटक्या जमाती (३३ टक्के), विशेष मागास प्रवर्ग (६ टक्के), दिव्यांग (४ टक्के), अनाथ (२ टक्के) आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एहर) (४ टक्के) यांचा समावेश आहे.

पात्र विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज करून शासकीय वसतिगृह योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, सोलापूर यांनी केले आहे.


**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**कार्यकारी अभियंता (विद्युत) विभाग, सोलापूर यांचे कार्यालय**

**९१६, सिव्हिल लाईन राष्ट्रीय महामार्ग वसाहत, सोलापूर ४१३००३**

जावक.क्र.का.अ./सोविवि/निलि/१४४७/२०२६ दूरध्वनी क्रमांक. (०२१७) २३१२८९४

दिनांक- ३१/०७/२०२६ Email ID- elsolapur.ee@gmail.com,elsolapur.ee@mahapwd.gov.in

**निविदा सुचना क्र. १०/२०२६-२७**

कार्यकारी अभियंता, सोलापूर विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर महाराष्ट्र शासनाकडील अनुज्ञप्तीधारक, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागास नोंदणीकृत व अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणा-या ठेकेदाराकडून B-1 (Percentage Rate) नमुन्यातील निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाच्या www.mahapwd.com वरील Pay PWD Online या पोर्टलवरुन डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा व अथवा रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सोलापूर विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. (कामाचे नाव: निविदेत एकूण ७ कामे आहेत.)

| Sr. No | Estimate No & Name of work | Tender Amount | Class of Contractor |
|---|---|---|---|
| 1) | Est No.1310337 of 2026-27 Providing Clock Tower Tenth floor decorative lighting system st Punyashlok Ahilyadevi Holkar Univercity, Solapur, Dist-Solapur | 615600.00 | Bidders Should have valid Electrical Contractor License issued. by I.E.& L Dept. Maharashtra and Registered Electrical Contractor Class D or above issued by Public works (Electrical) Department, Government of Maharashtra. |
| 2) | Est No.131036 of 2026-27 Providing Audio system, LED screen of 65 inch and Air conditioning system in Skill lab of the 100 bedded Womens Hospital, Solapur, Dist-Solapur | 608634.00 | |
| 3) | Est No.131006 of 2026-27 Providing repairs to Under ground cable and switchgear for the microbiology department in Dr. V.M.Medical College,Solapur, Dist-Solapur | 401198.00 | |
| 4) | Est No.2310271 of 2026-27 Providing Fully Annual Comprehensive maintenance contract for 5.5 Ton Capacity ductable package A. C. units and 4 Ton Cassette type A.C.units in the Niyojan Bhavan (For 1 year) Solapur, Dist-Solapur | 556165.00 | |
| 5) | Est No. 2310270 of 2026-27 Providing Fully Annual Comprehensive maintenance contract of 5.5 TR and 7.5 TR Capacity package A.C.,Unit of Ortho ICU, NICU, Pediatric ICU and Trauma ICU at Shri. CSM General Hospital (for 2 Year) Solapur, Dist-Solapur | 525280.00 | |
| 6) | Estimate No. :132004 of 2026-2027 - Providing Internal El to the new Dormitory Hall in the premises of Police Headquarters Rural Solapur | 545199.00 | |
| 7) | Estimate No. : 231022 of 2026-2027 Providing Repairs to El and Switchgear in Sonography room, Xray room,passege of the Radiology Department in B Block at SCSM general Hospital Solapur, Dist:Solapur | 410801.00 | |

१. निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १०/०८/२०२६ ते दिनांक १७/०८/२०२६

२. निविदा पुर्व बैठक व स्थळ :- निरंक

३. निविदा उघडणे :- दिनांक १८/०८/२०२६ रोजी कार्यकारी अभियंता, सोलापूर विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर, ९१६, सिव्हिल लाईन राष्ट्रीय महामार्ग वसाहत, सोलापूर-४१३००३.

खालील संकेतस्थळावर निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे. (www.mahapwd.com)

**सही/- (श्री.सु.गुजरे)**
**कार्यकारी अभियंता**
**सोलापूर सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/९८/२६-२७


# दुचाकी वाहनांसाठी MH 13-FF नवीन मालिका सुरु

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची गर्दी होते व त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो. बऱ्याच वेळा नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा, यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी दिनांक 11 ऑगस्ट 2026 रोजी सोबतच्या वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 04.00 या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी (केवळ क्र 16 अन्वये जारी झालेले डीडी), पत्त्याचा पुरावा, आधार लिंक मोबाईल नंबर, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः जमा करावा, सदर डीडी फक्त "Dy R.T.O. Solapur" यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बँकेचा असावा, या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील. अर्जासोबत केंद्रिय मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 4 तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 5 अ मध्ये विहीत केलेल्या पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल (उदा. आधार कार्ड, टेलिफोन बील इ.) एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दिनांक 11 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी 05.00 वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. या यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी सोबतच्या वेळापत्रकानुसार दर्शविलेल्या दिवशी (दि. 12 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी 02.00 वाजेपर्यंत) सीलबंद लिफाफ्यात कार्यालयात जमा करावा. लिलावासाठी सादर केलेला डीडी रुपये 300/- पेक्षा कमी रकमेचा नसावा. सदर डीडी फक्त "Dy R.T.O. Solapur" यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बँकेचा असावा, या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील. डीडी कमीत कमी एक महिना मुदतीमध्ये असावा. दिनांक 12 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी 04.00 वाजता प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांच्या उपस्थितीत पात्र व्यक्तीसमोर (संबंधित अर्जदार) लिफाफे उघडुन ज्या अर्जदाराने विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून 180 दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल, कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही, वाहन धारकाने एका वाहनासाठी एकापेक्षा जास्त आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी कार्यालयात डी.डी. जमा केल्यास सदर बाबीस कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**नवीन दुचाकी वाहनांच्या मालिकेचे वेळापत्रक (MH 13-FF)**

- » दिनांक 11 ऑगस्ट 2026 रोजी तिप्पट शुल्कचे अर्ज व दुचाकी वाहनांसाठी नियमित अर्ज वेळ सकाळी 11 ते 4 या वेळेत स्विकारले जातील.
- » दिनांक 11 ऑगस्ट 2026 रोजी सायंकाळी 5 वाजता यादी जाहीर केली जाईल.
- » दिनांक 12 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी 2 वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात लिलावासाठीचे डीडी स्वीकारले जातील.
- » त्यासाठी रक्कम रुपये 300 पेक्षा जास्त रकमेचे डीडी जमा करणे गरजेचे.
- » दिनांक 12 ऑगस्ट 2026 रोजी तिप्पट शुल्काच्या आलेल्या अजार्साठी व परिवहन संवर्ग वाहनांसाठी आलेल्या डबल अर्जाचा लिलाव दुपारी 04.00 वाजता.


# Classified - छोटी जाहीरात

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**


मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने** मो. 9353370779

**रेखा बर्वे** मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे २) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा ५) कोकणातील एक स्ट्राँग नेते ६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत) १०) ग्रॅज्युएट (मराठीत) १२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत) १६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा २५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क ३०) याचे कणीस भाजून खातात ३१) उत्सवाचा दिवस ३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख ४१) वाट, मार्ग (हिंदीत) ४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 24

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | | 8 | | 1 | 7 | 5 | |
| | 7 | | 5 | 4 | 9 | | 1 | |
| | | 3 | 6 | | 2 | | 8 | |
| 2 | | | 3 | | 6 | | 4 | |
| | 6 | | 1 | 5 | | | | |
| | 3 | 5 | | 8 | 4 | 6 | | |
| | | 6 | 4 | 1 | | | | |
| | 5 | 8 | | | | 9 | 2 | |
| | | 7 | 9 | | | 1 | 6 | 5 |

# जलयुक्त शिवारची उर्वरित २१५ कामे ३१ ऑगस्ट पर्यंत पूर्ण करावीत - जिल्हाधिकारी कार्तिकेयन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत एकूण ३५७२ कामांचा आराखडा मंजूर झाला आहे. त्यापैकी २८५३ कामे अभिसरणाची होती. यापैकी २६३८ कामे पूर्ण झाली असून २१५ कामे प्रलंबित आहेत. ही उर्वरित कामे कृषी, जलसंपदा व जलसंधारण विभाग यांनी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करून घ्यावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जलयुक्त शिवार अभियान, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान यांचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी राहुल क्षीरसागर, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. हरसुरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, प्रांताधिकारी सदाशिव पडदुने यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी आणि जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले की, सर्व प्रांताधिकाऱ्यांनी या कामांमध्ये लक्ष घालावे. पुढील दोन दिवसात तालुकास्तरीय समितीच्या बैठका घेऊन कृषी विभागाची २०३ कामांचे प्रस्ताव त्वरित मंजूर करून जिल्हास्तरीय समितीकडे पाठवावेत. तसेच जिल्हा परिषदेने ७१ कामे जलतारा योजनेत घेऊन तीही तालुकास्तरीय बैठकीत मंजूर करावीत. सर्व यंत्रणांनी जलयुक्तमधील कामांचे जिओ टॅगिंगचे फोटो आठ दिवसात अपलोड करावेत, असेही त्यांनी निर्देश दिले.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत जिल्ह्यात चार प्रकल्पांची कामे सुरू आहेत. आतापर्यंत ८२.५३ कोटी रुपये निधी खर्च झाला आहे. मात्र मागील चार महिन्यात काम पूर्ण करून निधी खर्च करण्यात हलगर्जीपणा दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी पुढील आठ दिवसात काम पूर्ण करून शंभर टक्के निधी खर्च करण्याची कार्यवाही करावी. प्रकल्प एक, दोन व तीनचे संबंधित अधिकारी यांनी काम व निधी खर्चात हलगर्जीपणा केल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावावी, असेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा जलसंधारण अधिकारी क्षीरसागर यांनी जलयुक्त शिवार अभियान, कृषी सिंचन योजना व गाळमुक्त धरण योजनेअंतर्गत झालेल्या कामांची माहिती दिली. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना ३.० मध्ये यावर्षी पुन्हा सोलापूर जिल्ह्याची निवड झाल्याचे त्यांनी सांगितले.

जलयुक्त शिवार अभियानाच्या ३५७२ कामांसाठी ९५.१५ कोटी रुपये निधी निश्चित करण्यात आला आहे. यात मृद व जलसंधारण विभाग, कृषी विभाग, भूजल सर्वेक्षण, ग्रामीण पाणीपुरवठा, वनविभाग व जलसंपदा विभाग यांचा सहभाग आहे. या कामांमुळे ६२३७.९१ टीसीएम पाणीसाठा निर्माण होऊन २४०५.८३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या चार प्रकल्पांसाठी एकूण ३२.९७ कोटी रुपये निधी तरतूद असून त्यापैकी ८२.५३ टक्के खर्च झाला आहे. जलतारा योजनेतील ३७६ कामे मंजूर असून १५५ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. अमृत सरोवरांतर्गत मंगळवेढा तालुक्यात ७ कामे मंजूर झाली आहेत. वैयक्तिक लाभार्थी उत्पादन पद्धतीसाठी ३.२३ कोटी रुपये मंजूर असून त्यापैकी ९१.८३ टक्के खर्च पूर्ण झाला आहे. गाळमुक्त धरण गाळमुक्त शिवार योजनेअंतर्गत सुरू असलेली नऊ कामे पावसामुळे बंद आहेत. पावसाळा संपल्यानंतर ती कामे सुरू केली जातील, असे जिल्हा जलसंधारण अधिकारी राहुल क्षीरसागर यांनी सांगितले.

# खा. डॉ. ज्योती वाघमारे यांच्याकडून पंतप्रधान मोदींना सोलापूरी चादरीची विशेष भेट

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** राष्ट्रीय हातमाग दिनाचे औचित्य साधून राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान निवासस्थानी भेट घेऊन सोलापूरचे वैभव मानली जाणारी आणि पंतप्रधान मोदींची प्रतिमा विणलेली विशेष 'सोलापुरी चादर' भेट दिली.



एनडीएच्या नवनिर्वाचित राज्यसभा आणि लोकसभा खासदारांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान निवासस्थानी खास अल्पोपाहाराचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात डॉ. ज्योती वाघमारे यांनी ही अद्वितीय भेट पंतप्रधान मोदींना सुपूर्द केली.

**बातम्याचे ठळक मुद्दे:**

हातमाग कलेचे कौतुक: सोलापुरी चादरीवर विणलेली आपली प्रतिमा पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कलाकृतीचे आणि सोलापूरच्या हातमाग परंपरेचे मनापासून कौतुक केले.

संघर्षमय प्रवासाची मांडणी: भेटीदरम्यान डॉ. वाघमारे यांनी आपला खडतर प्रवास पंतप्रधानांसमोर मांडला. एका गरीब कुटुंबातील आणि आंबेडकरी चळवळीतील दलित समाजाच्या मुलीला शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी थेट राज्यसभेवर पाठवून मोठी संधी दिली, असा कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी केला.

शिक्षणातील यशः अत्यंत गरिबीच्या परिस्थितीतून मार्ग काढत इंग्रजी विषयात 'पीएच. डी.' पूर्ण केल्याचे त्यांनी सांगितले.

'मोदी' परिसराचा रंजक उल्लेखः सोलापूर शहरात त्या ज्या भागात राहतात, त्या परिसराचे नावही 'मोदी' (मोदी परिसर) आहे, हा रंजक योग त्यांनी आवर्जून पंतप्रधानांच्या निदर्शनास आणून दिला.

एकनाथ शिंदेंप्रति सदभावनाः डॉ. ज्योती वाघमारे यांच्या संघर्षाचे कौतुक करत पंतप्रधान मोदींनी शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्याप्रति विशेष सदिच्छा व सद्भावना व्यक्त केल्या.

**प्रमुख मान्यवरांची उपस्थिती:** या मनमोकळ्या वातावरणात पार पडलेल्या संवाद कार्यक्रमात केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा, भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस नितीन नवीन यांच्यासह शिवसेना आणि एनडीएचे सर्व नवनिर्वाचित खासदार उपस्थित होते. याप्रसंगी पंतप्रधान मोदींनी सर्व नवीन खासदारांशी संवाद साधत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ‘न समजलेले आई-बाप समजून घेताना’

## बार्शीतील एमआयटी कॉलेजमध्ये वक्ते वसंत हंकारे यांचे व्याख्यान

बार्शी (कटूसत्य वृत्त):- वेगाने बदलणारी जीवनशैली, मोबाईल आणि सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, करिअरची स्पर्धा, मानसिक तणाव आणि कमी होत चाललेला कौटुंबिक संवाद यामुळे आज पालक आणि मुलांमधील नातेसंबंध अनेकदा तणावपूर्ण होताना दिसतात. एकाच घरात राहूनही संवादाचा अभाव, गैरसमज आणि भावनिक दुरावा वाढत असल्याची चिंता समाजात व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत एकमेकांना समजून घेणे, विश्वासाचे नाते निर्माण करणे आणि कुटुंबातील संवाद अधिक सुदृढ करणे ही काळाची गरज बनली आहे. याच सामाजिक जाणिवेतून बार्शीतील एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रिसर्च'च्या वतीने 'न समजलेले आई-बाप समजून घेताना' या अत्यंत संवेदनशील आणि समाजप्रबोधनात्मक विषयावर व्याख्यानाचे आयोजन शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता करण्यात आले आहे.

माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव स्वाती कराड चाटे यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शिका प्रा. प्रभा कासलीवाल व प्राचार्य डॉ. मधुकर लंगेरे यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयटी रेल्वे इंजिनिअरिंग कॅम्पसमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमात आपल्या प्रभावी व विचारप्रवर्तक शैलीसाठी प्रसिद्ध असलेले वक्ते वसंत हंकारे पालक आणि मुला-मुलींमधील नातेसंबंध अधिक दृढ करणे, परस्पर संवाद वाढविणे आणि कौटुंबिक मूल्यांचे महत्त्व आदी विषयावर विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थी व पालकांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# सोलापुरात ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा होणार

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** संयुक्त राष्ट्र संघाच्या संकल्पनेतून दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस 'जागतिक आदिवासी दिन' म्हणून जगभरात साजरा केला जातो. त्यानिमित्ताने रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता सोलापूर येथील एमआयटी कॉलेजजवळील धनश्री फंक्शन हॉल येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य आदिवासी फासेपारधी कर्मचारी संघटना व ट्रायबल आथारी फाउंडेशन यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा, इतिहास आणि सामाजिक योगदान यांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच शिक्षण, आरोग्य, रोजगार, सामाजिक न्याय, संविधानिक हक्क आणि सर्वांगीण विकास या विषयांवर जनजागृती करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

जागतिक आदिवासी दिन हा आदिवासी समाजाच्या अस्मितेचा, सांस्कृतिक वारशाचा आणि अधिकारांचा सन्मान करणारा दिवस मानला जातो. या निमित्ताने समाजातील विविध घटकांना एकत्र आणून आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी सकारात्मक विचारांची देवाणघेवाण होणार आहे. कार्यक्रमात विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार असून समाजहिताच्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

या ऐतिहासिक सोहळ्यास महाराष्ट्र राज्यातील आदिवासी कर्मचारी, फासेपारधी समाजबांधव, महिला, युवक-युवती आणि नागरिकांनी सहकुटुंब मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य आदिवासी फासेपारधी कर्मचारी संघटनेचे संस्थापक सुरेश पवार तसेच ट्रायबल आथारी फाउंडेशनचे संस्थापक विश्वनाथ धुमाळे यांनी केले आहे.

आदिवासी समाजाच्या एकतेचे, सामाजिक सक्षमीकरणाचे आणि सांस्कृतिक जतनाचे प्रतीक असलेल्या या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून तो यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# १२ व्या राष्ट्रीय हातकरघा दिनानिमित्त हातमाग परंपरेचा गौरव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारत सरकारच्या वस्त्र मंत्रालयाअंतर्गत विकास आयुक्त (हातकरघा) कार्यालय, मुंबई तसेच बुनकर सेवा केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वा राष्ट्रीय हातकरघा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सोलापूरच्या समृद्ध हातमाग परंपरेचा गौरव करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमास सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र (दादा) कोठे व सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमात हातमाग उद्योगातील विणकर, उद्योजक, कारागीर, सहकारी संस्थांचे पदाधिकारी तसेच वस्त्रोद्योग क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास तसेच कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्था, सोलापूरचे उपाध्यक्ष ॲड. सिद्धेश्वर बुगाडे, वस्त्रोद्योग मंत्रालयाचे सहाय्यक निदेशक विजयकुमार साळे, विनय दोते यंत्रमाग धारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच हातमाग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विणकरांचा सन्मान करण्यात आला. भारतीय हातमाग उद्योगाचा समृद्ध इतिहास, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नव्या बाजारपेठांतील संधी आणि केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

महापौर विनायक कोंड्याल यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "सोलापूरची ओळख जगभरात हातमाग उद्योगामुळे निर्माण झाली आहे. येथील विणकरांनी आपल्या कष्ट, कौशल्य आणि परंपरेच्या बळावर सोलापूरचे नाव देश-विदेशात पोहोचविले आहे. ही परंपरा जतन करणे आणि नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. हातमाग उद्योगाला आधुनिक तंत्रज्ञान, विपणन सुविधा आणि शासनाच्या योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी सोलापूर महानगरपालिका सकारात्मक सहकार्य करेल."

आमदार देवेंद्र (दादा) कोठे यांनी हातमाग उद्योग हा सोलापूरच्या अर्थव्यवस्थेचा आणि सांस्कृतिक वारशाचा महत्त्वाचा घटक असल्याचे सांगून विणकरांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे नमूद केले. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांद्वारे हातमाग क्षेत्राला अधिक बळकटी दिली जात असून, विणकरांच्या उत्पादनांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात उपस्थित विणकरांनी आपल्या समस्या व अपेक्षा मांडल्या. यावर संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाच्या विविध योजना, प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य, डिझाईन विकास आणि विपणन सुविधांबाबत सविस्तर माहिती दिली.

राष्ट्रीय हातकरघा दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे सोलापूरच्या समृद्ध हातमाग परंपरेला उजाळा मिळाला असून, विणकरांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास हातमाग क्षेत्रातील विविध संस्था, विणकर बांधव, महिला कारागीर, वस्त्रोद्योग प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नातेपुते महाविद्यालयात निर्भया पथक अकलूज अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयामध्ये नातेपुते राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सांस्कृतिक विभाग, महिला तक्रार व लैंगिक छळ प्रतिबंधक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने निर्भया पथक अकलूज पोलीस उपविभाग अंतर्गत महिला सुरक्षा व महिला सक्षमीकरण, अमली पदार्थ, वाहतुकीचे नियम आणि युवा पिढीचे योगदान या अनुषंगाने (ऐएसआय) समाधान देशमुख यांनी महाविद्यालयातील युवक युवतींना प्रबोधन करताना कुटुंब संस्था, शिक्षणसंस्था यातून घडत असलेली समाजसंस्था विकासाच्या वाटेवर घेऊन जाण्यासाठी महत्त्वाचा केंद्रबिंदू आजचा युवा वर्ग आहे. त्यामुळे अनिष्ट प्रवृत्तींना आळा घालून, व्यसनापासून व अमली पदार्थापासून दूर राहून, महिलांच्या सक्षमीकरणाची जबाबदारी



समाज हिताच्या दृष्टिकोनातून आजच्या युवा पिढीने घ्यावी.महिला सुरक्षा व सक्षमीकरणाविषयीचे कायद्यांचे व नियमांचे पालन करून देशाचा सुजाण नागरिक घडावा. याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रम प्रसंगी पो.कॉ. भुई, महिला पो.कॉ. पिसे उपस्थित होत्या. सदर कार्यक्रम मा.प्राचार्य डॉ.भगवानराव साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. जगदीशचंद्र मुळीक व प्रा.उत्तम सावंत यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा.बापूराव वाघमोडे, प्रा.डॉ.सी. एम साळुंखे, प्रा.भोपळे ए.बी., प्रा. सतीश पाटील, प्रा.हसन मोगल यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रा.पुष्पा सस्ते यांनी केले. प्रा.राजेंद्र साठे यांनी आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी, स्वयंसेवक उपस्थित होते.

# माढ्यातील मनोज जरांगे पाटील यांच्या आजच्या इशारा सभेची तयारी पुर्ण

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढ्यातील मनोज जरांगे पाटील यांच्या शनिवारी दि.८ ऑगस्ट रोजी होणाऱ्या इशारा सभेची तयारी पुर्ण झाली असून या निर्णायक आणी क्रांतीकारी सभेला हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मराठा समन्वयक माऊली पवार यांनी सकल मराठा समाजाला केले.

२९ ऑगस्टला मनोज जरांगे पाटील अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसणार आहेत.

या उपोषण आंदोलनाच्या पार्श्भुमीवर मनोज जरांगे पाटील यांनी राज्यव्यापी दौरा सुरु केला आहे.त्याचाच भाग म्हणून आज शनिवारी दुपारी ३ वाजता माढ्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील भव्य प्रांगणावर इशारा



सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सभेची तयारीचा आढावा घेण्यासाठी सोलापूर जिल्हातील मराठा समन्वयकांनी सभा स्थळाची पाहणी केली.

सोलापूर जिल्हात ६० हजारांहून अधिक बांधवानी

> मनोज जरांगे पाटील हे वैराग मार्गे माढा शहरात येतील.ते येताच छत्रपती शिवाजी महाराज चौकात त्यांचा क्रेनद्वारे हार घालून पुष्पवृष्टी करण्यात येईल. त्यानंतर सभा स्थळी जाऊन संबोधित करणार आहेत.

कुणबी प्रमाणपत्र काढली आहेत. ज्या व्यक्तिमुळे समाजाला कुणबी प्रमाणपत्राचा दाखला मिळाला.ते बांधव अजूनही आरक्षणाच्या लढ्यापासून अलिप्तच आहेत. अश्या मंडळीनी आता घराबाहेर पडण्याची गरज आहे.

समाजाला अखेरचा महत्वकांक्षी न्याय मिळवून घेण्यासाठी अखेरच्या लढ्यासाठी कुटूंबासमवेत आवर्जुन उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.

# राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त विणकर बांधवांचा सन्मानपत्र देऊन गौरव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ७ ऑगस्ट राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने विणकर बाग येथे हातमागावर काम करणाऱ्या विणकराच्या प्रतीकात्मक पुतळ्यास महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त सोलापूरच्या ऐतिहासिक हातमाग परंपरेला सलाम करण्यात आला तसेच हातमाग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विणकर बांधवांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, महिला व बालकल्याण सभापती निर्मला जंगम, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश दादा कोठे, नगरसेवक प्रथमेश दादा कोठे, सोलापूर मार्कंडेय सहकारी रुग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली, अशोक इंदापुरे, ज्येष्ठ माजी नगरसेवक रामचंद्र जन्नू, नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, सत्यनारायण गुर्रम, विनोद भोसले, अक्षय अंजीखाने, श्रीनिवास कोंडी, विजय चिप्पा, प्रशांत पल्ली, माजी नगरसेविका कुमुद अंकाराम, अंबादास बिगी, मंडळ अध्यक्ष नागेश सरगम, नागेश खरात, अजय दासरी, श्रीनिवास क्यातम, वासुदेव



इपलपल्ली, मुरलीधर आरकाल, रमेश विडप, मल्लिकार्जुन आरकाल यांच्यासह विणकर समाजाचे पदाधिकारी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, महिला, युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी हातमाग उद्योगात उल्लेखनीय योगदान देणारे प्रवीण फलमारी, नागनाथ वंगा, विजय बडगु, व्यंकटेश येमूल, महेश संचू, सत्यनारायण गंगा, श्रीनिवास अनंतुल तसेच झुंजा यांचा महापौर विनायक कोंड्याल व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.याप्रसंगी सोलापूर शहर भाजपा च्या वतीने राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त विणकर बांधवांचा विशेष सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या सन्मानपत्रामध्ये सोलापूरच्या जागतिक कीर्तीच्या हातमाग उद्योगाचा गौरव करण्यात आला असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमातून सोलापूरच्या विणकरांचा व वस्त्रोद्योगाचा उल्लेख करून केलेल्या गौरवाची आठवण करून देण्यात आली आहे. तसेच 'व्होकल फॉर लोकल' या संकल्पनेला बळ देत हातमाग उद्योगाच्या प्रगतीसाठी विणकर बांधवांनी केलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या सन्मानपत्राचे मार्गदर्शक आमदार देवेंद्र कोठे असून, संयोजक नगरसेवक सीए. विनोद धर्मा भोसले व नागेश सुरेश खरात यांनी या उपक्रमाचे आयोजन केले. सोलापूरच्या हातमाग परंपरेचे जतन आणि विणकर समाजाच्या कायार्चा गौरव करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक इंदापुरे यांनी केले. त्यांनी सोलापूरच्या हातमाग उद्योगाचा समृद्ध इतिहास जतन करण्यासाठी विणकर बाग येथे दरवर्षी राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त सात दिवसांचे हातमाग प्रदर्शन आयोजित करण्यात यावे, तसेच हातमाग उद्योगाचा इतिहास, पारंपरिक विणकामाची साधने, विविध वस्त्रप्रकार आणि विणकर समाजाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कायमस्वरूपी हातमाग संग्रहालय (म्युझियम) उभारण्यात यावे, अशी मागणी केली.

यावेळी बोलताना महापौर विनायक कोंड्याल म्हणाले की, "सोलापूरची ओळख ही हातमाग उद्योग आणि विणकरांच्या कष्टाळू परंपरेमुळे देशभर निर्माण झाली आहे. हजारो विणकरांच्या अथक परिश्रमातून सोलापुरी चादर, टॉवेल आणि इतर हातमाग वस्त्रांनी देश-विदेशात वेगळी ओळख निर्माण केली आहे. हा अमूल्य वारसा जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे."

ते पुढे म्हणाले, "विणकर समाजाने मांडलेल्या सात दिवसांच्या हातमाग प्रदर्शनाच्या तसेच कायमस्वरूपी हातमाग संग्रहालय उभारण्याच्या मागण्या अत्यंत रास्त असून, महानगरपालिका प्रशासनामार्फत त्यांचा सकारात्मक विचार करून आवश्यक कार्यवाही करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. हातमाग उद्योगाला चालना देणे, विणकरांच्या कलेला योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि सोलापूरचा सांस्कृतिक व औद्योगिक वारसा जतन करणे, यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे."

महापौरांनी राष्ट्रीय हातमाग दिनाच्या निमित्ताने सर्व विणकर बांधवांना शुभेच्छा देत पारंपरिक हातमाग उद्योगाला आधुनिक तंत्रज्ञान, नव्या बाजारपेठा आणि युवकांचा सहभाग मिळवून देण्यासाठी शासन, महानगरपालिका आणि समाजाने एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच 'लोकल ते ग्लोबल' या संकल्पनेनुसार सोलापूरच्या हातमाग उत्पादनांचा देश-विदेशात अधिक व्यापक प्रचार व प्रसार व्हावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचा समारोप विणकर समाजाच्या गौरवशाली परंपरेचा अभिमान व्यक्त करत आणि हातमाग उद्योगाच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करून करण्यात आला.

# सोलापूर शहरात ८ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट मनाई आदेश लागू

## शस्त्रे, स्फोटके, पाचपेक्षा अधिक व्यक्तींच्या जमावास बंदी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्तालय हद्दीत दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी ००.०१ वाजेपासून ते २२ ऑगस्ट २०२६ रोजी मध्यरात्री २४.०० वाजेपर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा) डॉ. अश्विनी पाटील यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) व (२) अन्वये हा आदेश जारी केला आहे.

**काय बाळगण्यास प्रतिबंध ?**

या कालावधीत शस्त्रे, अग्निशस्त्रे, बॅटन, तलवारी, भाले, दंडुके, सोटे, विना परवाना बंदुका, चाकू, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बाळगण्यास मनाई आहे. परवानाधारक बंदुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याची विशिष्ट परवानगी घेतल्यासच सूट राहील.

तसेच कोणताही स्फोटक पदार्थ, दगड, क्षेपणास्त्रे, ती फेकण्याची उपकरणे वाहून नेणे, गोळा करणे व तयार करणे, व्यक्ती-प्रेत-आकृती-पुतळ्यांचे प्रदर्शन, सार्वजनिक ठिकाणी टीका करणारे उच्चार, गाणी, संगीत वाजवणे यावर बंदी घालण्यात आली आहे.

शालीनता किंवा शिष्टाचाराला बाधा आणणारी चित्रे, चिन्हे, फलक, वस्तू तयार करणे, प्रदर्शित करणे किंवा प्रसारित करणे, ज्यामुळे सामाजिक नैतिकता, सार्वजनिक सुरक्षा धोक्यात येईल किंवा राज्यव्यवस्थेविरुद्ध वातावरण निर्माण होईल, अशा कृतींनाही प्रतिबंध करण्यात आला आहे.

**उल्लंघन केल्यास कारवाई**

प्रतिबंधित वस्तूंसह आढळल्यास कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यामार्फत संबंधित व्यक्तीस निःशस्त्र केले जाईल. जप्त केलेली शस्त्रे, स्फोटके, क्षेपणास्त्रे राज्य सरकारकडे जमा करण्यात येतील.

**कोणाला सूट**

1. सरकारी/निमसरकारी सेवेत असलेल्या व कर्तव्यासाठी शस्त्र बाळगणे आवश्यक असलेल्या व्यक्तींना.

2. खाजगी सुरक्षा रक्षक, गुरखा, चौकीदार यांना ३.५ फूट लांबीपर्यंतची लाठी बाळगण्यास परवानगी.

**पाच किंवा अधिक व्यक्तींच्या जमावावर बंदी**

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) नुसार याच १५ दिवसांच्या कालावधीत सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत पाच किंवा अधिक व्यक्तींच्या कोणत्याही संमेलनास, मिरवणुकीस, तसेच मिरवणुकीत लाऊडस्पिकर, वाद्य, बँड व फटाके वाजवण्यास मनाई आहे.

**खालील बाबींना सूट :**

- विवाह समारंभ, अंत्यसंस्कार
- सहकारी संस्था, कंपन्या, क्लब, संघटनांच्या कायदेशीर बैठका
- चित्रपटगृहे, नाट्यगृहे, सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी प्रेक्षकांचे संमेलन
- सरकारी/निमसरकारी कार्यालये, न्यायालये येथील शासकीय कामकाजासाठीचे संमेलन
- शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमधील शैक्षणिक उपक्रम
- कारखाने, दुकाने, आस्थापनांमधील सामान्य व्यापार-व्यवसायासाठीचे संमेलन
- विभागीय पोलीस उप आयुक्त किंवा पर्यवेक्षक अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेले संमेलन/मिरवणुका